# <u>मुंबई विद्यापीठ</u>

आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग

<u>विद्यापीठ विदयार्थी भवन, बी रोड, चर्चगेट, मुंबई- 400 020</u>

<u>दुरध्वनी - 2204 3478 / 2281 3020 /website: www.mudlle.ac.in</u>

<u>मराठी भाषांतर</u>

<u>परिपत्रक क 1</u> **<u>For English Version Please Log on to www.mudlle.ac.in</u>**

**प्रति,**
**प्राचार्य,**
**कला, वाणिज्य व शास्त्र महाविदयालये,**
**शिक्षणशास्त्र महाविदयालये व संस्था,**
**मुंबई**

विषय ः ***<u>10 अतिरिक्त गुणांसाठीचे विस्तार कार्य व विस्तार कार्य शिक्षक व विदयार्थ्यांसाठी प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यकम</u>***

माननीय प्राचार्य,

सन 2011 - 2012 या नवीन शैक्षणिक वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

मुंबई विद्यापीठाच्या कलम 229 -अ अंतर्गत 120 तासांचे शैक्षणिक कार्य पूर्ण करणा-या विदयार्थ्यांना 10 अतिरिक्त गुण देणारा **विस्तार कार्य** हा उपकम मुंबई विद्यापीठाच्या (DLLE) **<u>आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागामार्फत</u>** चालविण्यात येत आहे. सन 2010 - 2011 या शैक्षणिक वर्षात 162 पदवी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील एकूण 12,548 विद्यार्थ्यांनी या उपकमामध्ये सहभाग घेतला. *<u>तथापि हे उपकम एन.सी.सी. व एन.एस.एस.पेक्षा पूर्णतः वेगळे आहेत. म्हणून जे विद्यार्थी व शिक्षक एन.सी. सी., एन.एस.एस.किंवा तत्सम उपकमांमध्ये यावर्षी सामील झालेले आहेत त्यांना या उपकमामध्ये सहभाग घेता येणार नाही.</u>*

**<u>या उपकमांबाबतची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे</u>** ः-

या विभागामार्फत 7 विविध प्रकारचे प्रकल्प विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**1) <u>विस्तार कार्य प्रकल्प</u> ः-**

**i) व्यवसायभिमुख उपकम ः-**

विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन घेण्यासाठी तसेच त्यांना तंत्रविज्ञान कौशल्य आत्मसात करता यावे म्हणून पुढील उपकम राबविण्यात येतात.

1) अन्नपूर्णा योजना प्रकल्प (APY) – i.e. Entrepreneurship Skills Development Education (ESDE)
2) करिअर प्रकल्प (CP) i.e. Career Skills Development Education (CSDE)
3) माहिती तंत्रज्ञान प्रकल्प (ITP) i.e. Information Communication Technology- Skills Development Education (ICT-SDE)
4) औदयोगिक मार्गदर्शन प्रकल्प (IOP) i.e. Industry Orientation Skills Development Education (IOSDE)

**ii) समाजाभिमुख प्रकल्प ः-**

1) राष्ट्रीय मुक्त विदयालय (NIOS) i.e. Learning Skills Development Education (LSDE)
2) लोकसंख्या शिक्षण प्रकल्प (PEC) i.e. Population Education Programme (PEP)
3) स्त्रियांच्या दर्जाचे सर्वेक्षण (SWS) i.e. Women Empowerment Education Programme (WEEP)

वरील उपकमापैकी विद्यार्थ्यास कोणत्याही केवळ एका उपकमात पारंपारिक ¼जुन्या) पध्दतीने अथवा नविन (Online) पध्दतीने सहभाग घेता येईल.

**2) <u>विस्तार कार्य विद्यार्थी</u> ः-**

औदयोगिक मार्गदर्शन प्रकल्पासाठी 240 तासांचे व इतर प्रकल्पांतर्गत प्रत्येकी 120 तासांचे कार्य विद्यार्थ्यांनी पूर्ण करणे कमप्राप्त (अनिवार्य) आहे. तरच विदयार्थ्यांना कलम 229 - अ अंतर्गत 10 अतिरिक्त गुणांचा मोबदला दिला जातो.

**3) <u>विस्तार कार्य विद्यार्थी व्यवस्थापक</u> ः-**

महाविदयालयाने दर 24 विद्यार्थ्यांसाठी 1 याप्रमाणे विद्यार्थी व्यवस्थापकाची नेमणूक करावी जो विस्तार कार्य शिक्षकास मदत करेल. विद्यार्थी व्यवस्थापकाचे कार्य महत्वपूर्ण असल्याने त्याची नेमणूक करताना विशेष काळजी घ्यावी.

***<u>विद्यार्थी व्यवस्थापकास पुढील कार्य करावे लागते.</u>***

1. महाविद्यालयीन पातळीवर तसेच समाजपातळीवर राबविलेल्या सर्व उपकमांमध्ये उपस्थित असणे.
2. वार्षिक महोत्सव कार्यकमातील उपस्थिती (उडान महोत्सव)
3. प्रकल्प अहवाल लेखन व तयारी
4. शिक्षकांना विस्तार कार्य संबंधित सर्व कार्यालयीन कामकाज करण्यास सहकार्य करणे.
5. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली इतर विद्याार्थ्यांच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करणे.

विद्यार्थी व्यवस्थापकाच्या समुहातील विद्यार्थी जेव्हा महाविद्यालयातील अथवा समाजपातळीवर जे उपकम राबवतील त्या सर्व उपकमांना विद्यार्थी व्यवस्थापक हजर रहाणे कमप्राप्त (अनिवार्य) आहे.

**4)** <u>**विस्तार कार्य शिक्षक**</u> **:-**

एन.सी.सी. / एन.एस्.एस.किंवा तत्सम उपक्रमांमध्ये सहभागी **नसलेल्या** शिक्षकांची नेमणूक महाविद्यालयाने विस्तार कार्यासाठी करावी.

***विस्तार कार्य शिक्षकाचे कार्य***

1. प्रथम सत्र व व्दितिय सत्र प्रशिक्षणास उपस्थिती राहणे.
2. विद्यार्थी व्यवस्थापकाच्या सहकार्याने महाविद्यालयात प्रथम सत्र व द्वितीय सत्र प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
3. महाविद्यालयासाठी नेमण्यात आलेल्या क्षेत्र समन्वयकाच्या भेटीचे आयोजन करणे.
4. विद्यार्थी व्यवस्थापकाच्या सहकार्याने विस्तार कार्य विद्यार्थ्यांच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करणे.
5. विद्यार्थी व्यवस्थापकाच्या सहकार्याने विभागास सादर करण्यात येणारी महत्वपूर्ण कागदपत्रे तयार करणे .
6. विद्यार्थ्यांचे प्रकल्प अहवाल तपासणे. तसेच
   - अ. महाविद्यालयीन तसेच समाजपातळीवर राबविलेल्या सर्व उपक्रमांमध्ये उपस्थित असणे.
   - ब. सामाजिक पातळीवर महिन्यातुन किमान एकदा क्षेत्र भेटी देणे.
   - क. विस्तार कार्य क्षेत्र समन्वयकाच्या क्षेत्र भेटी वेळी उपस्थित राहणे.
   - ड. क्षेत्र समन्वयकाच्या क्षेत्र भेटीच्या वेळी सर्व विद्यार्थी उपस्थित राहण्याची दक्षता घेणे.

**5)** <u>**विस्तार कार्य क्षेत्र समन्वयक**</u> **:-**

विस्तारकार्य महाविद्यालयीन पातळीवर सुरळीत चालण्यासाठी तसेच विदयार्थ्यांना येण्या-या समस्यांचे निराकरण, मार्गदर्शन करण्यासाठी महाविदयालयांसाठी क्षेत्र समन्वयकाची नेमणूक विभागामार्फत केली जाते. ***<u>त्यांचे कार्य पुढील प्रमाणे</u>***

1. प्रथम सत्र व व्दितिय सत्र प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी महाविद्यालयांना सहकार्य करणे व पर्यवेक्षण करणे.
2. विस्तार कार्य शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थी व्यवस्थापक यांच्या सहकार्याने क्षेत्र भेटीचे आयोजन करणे.
3. विस्तार कार्य शिक्षकाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचे प्रकल्प अहवाल तपासणे

**6)** <u>**विस्तार कार्यातील आर्थिक घटक**</u> **:-**

**अ. <u>महाविद्यालयीन स्तर</u> :-**

***1. विद्यार्थ्यांची सहभागी फी :-***

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेकडून मान्यता मिळाल्यानुसार विस्तार कार्यात सहभाग घेणा-या विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी रू.200 /- जमा करण्यात यावे. त्यापैकी प्रत्येकी रू.100/- महाविद्यालयपातळीवर विस्तार कार्यास खर्च करण्यासाठी महाविद्यालयास ठेवण्याची अनुमती देण्यात आली आहे.ज्यामधून विस्तार कार्य शिक्षक तसेच विस्तार कार्य विद्यार्थी व्यवस्थापकाचा प्रशिक्षण कार्यक्रम क्षेत्रभेटी तसेच सभेचा प्रवासखर्च व इतर वैकल्पिक खर्च तसेच विस्तार शिक्षकाचे मानधन यासाठी केला जावा व उर्वरीत प्रत्येकी रू.100 /- <u>**"वित्त व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ"**</u> यांच्या नावे सर्व रक्कमेचा **एकत्रित डिमांड ड्राफ** विभागात पाठवावा. विभाग तसेच महाविद्यालयीन पातळीवरील विस्तार कार्यातील सर्व उपक्रम व कार्यक्रमाचा खर्च याच शुल्कातुन होत असतो.त्यामुळे महाविद्यालयातील या उपक्रमामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी सहभाग घेतील याची दक्षता घ्यावी दर 50 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक नेमावा.

***2. शिक्षकांचे मानधन :-***

1. ज्या विस्तारकार्य शिक्षकाकडे 50 विद्यार्थी आहेत अशा शिक्षकास वार्षिक रू.2000 /- व
2. ज्या विस्तारकार्य शिक्षकाकडे 25 विद्यार्थी आहेत अशा शिक्षकास वार्षिक रू.1000 /- तसेच
3. किमान 12 विद्यार्थी ज्या शिक्षकाकडे आहेत अशा शिक्षकास वार्षिक रू.500/-

हे मानधन महाविद्यालयामार्फत विदयार्थ्यांच्या खर्चासाठी रू.100 प्रमाणे महाविद्यालयीन पातळीवर जमा केलेल्या सहभागी फी मधून देण्यात यावे.

**ब. <u>विभागीय स्तर</u> :-**

विभाग पातळी वर विस्तार कार्य विद्यार्थ्यांच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करणे.

**1. विभागामार्फत आयोजित केले जाणारे उपक्रम :-**

विभागामार्फत विभागात आयोजित केल्या जाणा-या कार्यक्रम व उपक्रमांचा खर्च विभागामार्फतच केला जातो. विस्तारकार्य शिक्षक व विद्यार्थी व्यवस्थापकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम विकेंद्रितपणे विभागामध्ये तसेच विविध महाविद्यालयीन केंद्रांमध्ये जुलै 2011 मध्ये आयोजित केला जाणार आहे.त्यासंबंधित माहिती लवकरच आपणास देण्यात येईल. या पत्रासोबत विस्तारकार्यात सहभागी होण्यासाठी नोंदणी अर्ज पाठवित आहोत.सर्व विस्तार कार्य शिक्षकांनी ( जुने /नवीन ) हा अर्ज पूर्ण भरावा व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या सही व शिक्क्यासह 10 **जुलै,2011 पुर्वी** विभागाकडे सूपूर्द करावा. ही विनंती.धन्यवाद !

आपला विश्वासू

**डॉ.दिलीप शं. पाटील**
**प्राध्यापक आणि संचालक,**
**आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग,**
**मुंबई विद्यापीठ**